M.I.D.C Police Stasion, Jalgaon, Dist. Jalgaon, Maharashtra
एम.आय.डी.सी पोलीस स्टेशन, जळगांव ता. जळगांव जि.जळगांव महाराष्ट्र
Ph. No.02557- 2210500. Email ID- pstn.midc@gmail.com.
Pin No.425001

-- प्रेस नोट --

एमआयडीसी पोलीस स्टेशन
दिनांक ३०/०३/२०२६

प्रति,

मा. संपादक

-----------------------------

विषय - गावठी कट्टा व जिवंत काडतुसासह दोन ईसम एमआयडीसी पोलीस स्टेशन जळगाव कडून जेरबंद.

--------ooo-------

जळगाव शहरातील कुसुंबा,एअरपोर्ट रस्त्यावर एक ईसम गावठी कट्टा बाळगुन फिरत असल्याची गोपनीय बातमी प्राप्त झाल्याने एमआयडीसी पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांनी तात्काळ एमआयडीसी पोलीस स्टेशनच्या गुन्हे शोध पथकाचे पोउनि राहुल तायडे, पोउनि चंद्रकांत धनके, पोहेकॉ किरण चौधरी, पोहेकॉ प्रमोद लाडवंजारी, पोहेकॉ गिरीश पाटील, पोकॉ विशाल कोळी, पोकॉ नितीन ठाकुर अशांना तात्काळ आवश्यक त्या सुचना देवुन कारवाई करणे बाबत सुचना दिल्या.

वर नमुद पथकाने दि.२८/०३/२०२६ रोजी जळगाव शहरातील छत्रपती संभाजीनगर रोडवरील एअरपोर्ट पुढील तारा बिझनेस पार्क परिसरात एक दुचाकी वर दोन ईसम संशयितरित्या फिरतांना आढळून आल्याने सदर दुकाची चालकांना वाहन थांबण्याचा ईशारा केला असता त्यांनी वाहन न थांबवता पळ काढला असता वर नमुद पथकाने शिताफीने पाठलाग करुन सदर संशयित दुचाकी चालकांना थांबवुन विचारपुस करुन त्यांची अंगझडती घेता दुचाकी चालकाच्या कमरेला एक गावठी कट्टा व खिशात ०३ नग जिवंत काडतुस मिळुन आल्याने त्यांना विचारपुस करता त्यांनी त्यांचे नाव अनुक्रमे १) दिपक ठकुबा गुंजाळ वय २८, रा दुर्गा नगर, सिल्लाड, जि. छत्रपती संभाजीनगर, व त्याचा साथीदार नामे २) विठ्ठल रंगनाथ सोनवणे, वय २५, रा.दुर्गा नगर, सिल्लोड, जि. संभाजीनगर असे सांगितले. सदर संशयित ईसमांना विश्वासात घेवुन गावठी कट्टा कोणाकडून घेतला बाबत विचारपुस करता सदरचा गावठी कट्टा त्यांनी आजच जळगाव शहरातील तांबापुरा भागात राहणारा अजय बिरजु गारुंगे याच्याकडून विकत घेतल्याची कबुली दिल्याने वर नमुद सदर संशयित ईसमांना ताब्यात घेवुन त्यांच्याविरुध्द एमआयडीसी पोलीस स्टेशन सिसिटीएनएस २३१/२०२६ आर्म्स ॲक्ट ३/२५, मोटार वाहन कायदा १८४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संशयित आरोपी नामे १) दिपक ठकुबा गुंजाळ वय २८, रा दुर्गा नगर, सिल्लाड, जि. छत्रपती संभाजीनगर, व त्याचा साथीदार नामे २) विठ्ठल रंगनाथ सोनवणे, वय २५, रा.दुर्गा नगर, सिल्लोड, जि. संभाजीनगर यांच्याकडुन

१) २०,०००/- रु कि.चे एक गावठी बनावटीचे पिस्तुल,
२) ३,०००/- रु कि.चे ०३ नग जिवंत काडतुस,
३) १,००,०००/- रु कि.चे एक बजाज कंपनीची पल्सर RS २०० स्पोर्ट्स बाईक
४) १०,०००/- रु कि चा एक ॲण्डाईड मोबाईल फोन

---------------------------------------------

एकुण- १,३३,०००/- रु कि चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्यातील संशयित ईसम अजय बिरजु गारुंगे याचा शोध घेता मिळुन आलेला नसुन फरार आहे. वर नमुद अटक करण्यात आलेल्या आरोपीतांना मा. न्यायालयात हजर केले असता त्यांना दोन दिवसाची पोलीस कस्टडी देण्यात आली असुन सदर गुन्ह्याचा तपास पोउनि चंद्रकांत धनके व पोकॉ चेतन पाटील करीत आहे.

सदरची कारवाई डॉ.महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक जळगाव, मा.अशोक नखाते, अपर पोलीस अधीक्षक जळगाव, मा.नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव भाग, मा. केदार बारबोले, उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ भाग, पोलीस निरीक्षक बबन आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे.




vivo V40 | ZEISS

24mm f/1.88 1/438s ISO50
03/30/2026, 15:58